# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 16 October 2024

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- राज्य विधानसभा आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर– २० नोव्हेंबरला मतदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी
- राज्यात ५३० मॉडेल मतदान केंद्र उभारण्याचं निवडणूक आयोगाचं नियोजन, सर्व मतदान केंद्रात होणार वेबकास्टिंग
- धाराशिव, नांदेड आणि लातूर जिल्ह्यात मतदान जनजागृती आणि आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन सज्ज
- राज्यातल्या आणखी सहा जातींचा ओबीसीत समावेश करण्याची राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाकडून केंद्र सरकारला शिफारस

आणि

- भारत–न्यूझीलंड क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेला आजपासून बंगळुरुमध्ये सुरुवात

****

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी काल पत्रकार परिषद घेऊन या कार्यक्रमाची घोषणा केली. महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक एकाच टप्प्यात होणार असून, संपूर्ण राज्यात आचारसंहिता कालपासून लागू झाली.

***‘‘निवडणुकीची अधिसूचना २२ ऑक्टोबरला जारी होणार असून, त्यादिवसापासूनच नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरुवात होणार आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत नामनिर्देशनपत्रं दाखल करता येणार आहेत. ३०***

*ऑक्टोबरला अर्जांची छाननी तर चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. राज्यात मतदान २० नोव्हेंबर रोजी होणार आहे.*

*नांदेडचे खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनानं रिक्त झालेल्या लोकसभेच्या एका जागेच्या पोटनिवडणुकीसाठी याच टप्प्यात निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार असून, २० नोव्हेंबरलाच मतदान घेतलं जाणार आहे.*

*लोकसभेच्या वायनाड मतदार संघाचे खासदार राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्यानं रिक्त झालेल्या जागेच्या पोटनिवडणुकीसाठी १३ नोव्हेंबर रोजी मतदान घेतलं जाणार आहे.*

*झारखंडमध्ये निवडणूक दोन टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्प्यात ४३ मतदार संघात १३ नोव्हेंबरला तर दुसऱ्या टप्प्यात ३८ मतदार संघांमध्ये २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे.*

*सर्व ठिकाणची मतमोजणी एकाच दिवशी २३ नोव्हेंबरला होणार असल्याचं राजीवकुमार यांनी सांगितलं.''*

निवडणूक प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा पूर्ण वापर केला जाणार असून, आपल्या मतदान केंद्राची माहिती मतदारांना संबंधित संकेतस्थळावर पाहता येणार असल्याचं, राजीवकुमार यांनी सांगितलं. महिला संचलित मतदान केंद्रांची स्थापना तसंच सर्व मतदान केंद्रांवर अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, मतदानासाठी आलेल्या मतदारांना रांगांमध्ये बसण्यासाठी बाकांची व्यवस्था केली जाणार आहे. दिव्यांग तसंच ८५ वर्षांवरील मतदारांसाठी गृहमतदानाची व्यवस्था कायम राहणार आहे. राज्यातली निवडणूक यंत्रणा, मतदान केंद्रं आणि मतदारांबाबतही यावेळी माहिती देण्यात आली.

*''राज्यातल्या ३६ जिल्ह्यातल्या २८८ जागांपैकी २३४ जागा सर्वसाधारण उमेदवारांसाठी असून, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी २९ तर अनुसूचित जमात प्रवर्गासाठी २५ जागा राखीव आहेत. राज्यात एकूण नऊ कोटी ६३ लाख मतदार असून, यामध्ये चार कोटी ९७ लाख पुरुष आणि चार कोटी ६६ लाख महिला मतदारांचा समावेश आहे. यापैकी १८ लाखावर मतदान पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजावणार आहेत. राज्यात एकूण एक लाख १८६ मतदान केंद्रं उभारण्यात येणार असून, यापैकी ५३० आदर्श मतदान केंद्र उभारण्याचं नियोजन करण्यात आलं आहे.''*

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आपल्या निवडणूक चिन्हात साम्य असल्याच्या कारणावरून ट्रम्पेट अर्थात पिपाणी हे चिन्ह गोठवण्याची मागणी केली होती, मात्र ही दोन्ही चिन्हं वेगवेगळी असल्यानं, त्याचा मतदानावर कोणताही परिणाम होत नाही, असं सांगत, हे चिन्ह गोठवलं जाणार नसल्याचं राजीवकुमार यांनी सांगितलं.

राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या संदर्भात निर्णय घेताना सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आणि इतर मार्गदर्शक सूचना विचारात घेऊ, असंही राजीव कुमार यांनी सांगितलं. निवडणूक आयोगाचं पथक मुंबई दौऱ्यावर असताना, रश्मी शुक्ला यांना हटवण्याची मागणी काँग्रेसनं केली होती. त्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते.

दरम्यान, बनावट ध्वनिचित्रफिती चालवून मतदारांची दिशाभूल करणाऱ्यांवर कारवाईचे संकेतही त्यांनी दिले. माध्यमांनी मतदानाचे तसंच मतमोजणीचे कल जाहीर करतांना काळजी घ्यावी, आणि यापूर्वीच्या अनुभवांवरून आत्मचिंतन करण्याची गरज राजीवकुमार यांनी व्यक्त केली. ते म्हणाले...

> ***''पहली काऊंटींग साडेआठ बजे शुरू होती है। और हमारे पास प्रमाण है इसबार की आठ पांच, आठ दस, आठ पंधरह पर आने लगा इतने की लीड, इतने की इतने की लीड। ऐसा तो नही है की वो जस्टीफाइ करने के लिये शुरू मे ये ट्रेंडस् आ गये। एक विषय ऐसा है जिस पर कुछ ना कुछ मंथन की, कुछ ना कुछ अँड आय ॲम शुअर जब जब इस देश में इस तरह की जरूरत होती है, तो एक सेल्फ करेक्शन जरूर करेंगे।''***

विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेणारा 'रणांगण विधानसभेचं' हा कार्यक्रम उद्या गुरुवारी, १७ ऑक्टोबरपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागांच्या Youtube चॅनल्सवरुन हा कार्यक्रम आपण ऐकू शकाल.

****

विधान परिषदेवरच्या राज्यपाल नियुक्त ७ सदस्यांना विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी काल सदस्यत्वाची शपथ दिली. यामध्ये चित्रा वाघ, विक्रांत पाटील, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, पंकज भुजबळ, इद्रिस नाईकवाडी, हेमंत पाटील आणि मनीषा कायंदे यांचा समावेश आहे.

****

विधानसभेच्या आगामी निवडणुकीसाठी काँग्रेसनं अखिल भारतीय काँग्रेस समितीचे वरिष्ठ निरीक्षक आणि वरिष्ठ निवडणूक समन्वयकांची नेमणूक केली आहे. मराठवाड्यासाठी सचिन पायलट आणि उत्तम कुमार रेड्डी यांच्याकडे निरीक्षकपदाची जबाबदारी देण्यात आल्याचं काँग्रेसनं पत्रकाद्वारे जाहीर केलं आहे.

****

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानं राज्यातल्या आणखी सहा जातींचा इतर मागासवर्गीय यादीत समावेश करण्याची शिफारस केंद्र सरकारला केली आहे. कुलवंत वाणी, कुणबी वाणी, कराडी, कानोडी किंवा कनाडी, नेवेवाणी, सलमानी, तसंच निषाद – मल्ला – मल्लाह किंवा नाविक या सहा जातींचा समावेश केंद्राच्या सूचीत करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं आयोगाकडे पाठवला होता. त्यावर गेल्या वर्षी १७ ऑक्टोबरला तसंच यावर्षी २६ जूनला मुंबईत आयोगानं जनसुनावणी घेतली, त्यात सर्व कागदपत्र योग्य आढळल्यानं केंद्र सरकारला ही शिफारस केली असल्याचं, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या चार विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात १४ लाख दोन हजार ३२५ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. घरोघरी जाऊन नागरिकांना मतदानाचं आवाहन केलं जाणार आहे, मतदान चिठ्ठ्या घरोघरी पोहोचवल्या जाणार आहेत, तसंच मतदार जनजागृती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्याचं जिल्हाधिकारी ओंबासे यांनी सांगितलं.

****

नांदेड जिल्ह्यात २७ लाख ७१ हजार ४५३ मतदार आहेत. जिल्ह्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी २१ हजार ५१६ अधिकारी, कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत. जिल्ह्यात ९ मतदान केंद्र हे शंभर टक्के महिला अधिकारी असलेले, नऊ मतदान केंद्र १०० टक्के दिव्यांग अधिकारी असलेले आणि नऊ मतदान केंद्र हे युवा मतदान अधिकारी असलेले केंद्र राहतील, असं जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी सांगितलं. दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे विधानसभेसोबत लोकसभा पोटनिवडणूक होत आहे. त्यामुळे लोहा,

किनवट, हदगाव हे तीन मतदारसंघ वगळता अन्य सहा मतदार संघामध्ये यावेळी निवडणुकीसाठी मतदारांच्या बोटाला शाई एकदाच लागेल. मात्र त्यांना विधानसभा आणि लोकसभेसाठी मतदान करावं लागणार आहे. मतदान केंद्रामध्ये गेल्यानंतर विधानसभा आणि लोकसभा मतदान करण्यासाठी वेगवेगळ्या ईव्हीएम मशीन असतील अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे.

****

लातूर जिल्ह्यात २० लाख ३६ हजार ५६७ मतदार आपला हक्क बजावणार आहेत. जिल्ह्यात ४० नवीन मतदान केंद्रांची वाढ झाली असून एकूण २ हजार १४२ मतदान केंद्र राहणार आहेत. सी-व्हीजील ॲपच्या माध्यमातून नागरिकांना आदर्श आचारसंहिता भंगाची तक्रार करता येणार असल्याचं जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी सांगितलं.

****

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आजपासून बंगळूरु इथं सुरु होत आहे. सकाळी साडे नऊ वाजता सामन्याला सुरुवात होईल. जागतिक कसोटी विजेतेपदासाठी भारतीय संघाला आता दहा सामन्यांपैकी सात सामन्यांमध्ये विजय मिळवणं आवश्यक आहे. त्यादृष्टीनं न्यूझीलंडविरुद्धची तीन सामन्यांची मालिका महत्त्वपूर्ण आहे.

****

नांदेड इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतरमहाविद्यालयीन `ज्ञानतीर्थ` युवक महोत्सव १८ ते २१ ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे. विष्णुपुरी इथं सहयोग सेवाभावी संस्थेच्या कॉलेज ऑफ एज्युकेशन इथं नियोजित या महोत्सवात नांदेड, परभणी, लातूर, आणि हिंगोली जिल्ह्यातल्या ९९ महाविद्यालयातले दीड हजार विद्यार्थी कलावंत सहभागी होणार आहेत.

****

लोकशाही अधिक निकोप आणि बळकट करून तिच्या संवर्धनासाठी युवकांचा मतदानात अधिकाधिक सहभाग महत्त्वाचा असल्याचं, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटलं आहे. ते काल महात्मा गांधी मिशन विद्यापीठात ‘युवा संवाद’ कार्यक्रमात बोलत होते. कुलगुरु डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

आपले अधिकार आणि कर्तव्य याप्रती जागरुकता येण्यासाठी युवकांनी मतदानाचा हक्क आणि कर्तव्य पार पाडावं, असं आवाहनही स्वामी यांनी केलं.

****

नांदेड महापालिकेच्या सिडको क्षेत्रिय कार्यालयाचे प्रभारी सहायक आयुक्त संभाजी काष्टेवाड आणि प्रभारी वसुली लिपिक महेंद्र पठाडे यांना काल २१ हजार रुपयांची लाच घेताना पकडण्यात आलं. प्लॉट नावे करून देण्यासाठी त्यांनी ही लाच मागितली होती.

****